MHNB050002382026

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १७९/२०२६

ममता काशिनाथ चौधरी

// विरूध्द //

निरंक
कै. काशिनाथ लिमजी चौधरी

## दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १७९/२०२६ मध्ये निशाणी ०१ वरील आदेश

१.       प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी मयत काशिनाथ लिमजी चौधरी याचे वारस असल्याबाबत मुंबई वारसा अधिनियम अन्वये वारसा प्रमाणपत्र मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे.

२.       अर्जदारांचे थोडक्यात म्हणणे असे की, अर्जदार ममता काशिनाथ चौधरी हे मयत काशिनाथ लिमजी चौधरी यांची पत्नी आहे. काशिनाथ लिमजी चौधरी हे दिनांक १७/०४/२०२० रोजी मौजे कुढावद, ता.शहादा जि.नंदूरबार येथे मयत झाले आहे. मयत काशिनाथ लिमजी चौधरी हयांच्या मृत्यू नंतर (मयताचे वारस) १.शकुंतलाबाई लिमजी चौधरी– आई, २. ममता काशिनाथ चौधरी–पत्नी, ३.दिपाली कृष्णा पटेल– मुलगी व ४.चैतन्य काशिनाथ चौधरी–मुलगा हे वारस आहेत. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी व तत्सम गरजेकरीता वारस असल्यासंबंधी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. म्हणून अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळविण्यासाठी प्रस्तूत अर्जाद्वारे मागणी केली आहे.

३.       सदर अर्जाच्या अनुषंगाने "दैनिक वार्ता" वृत्तपत्रातून जाहिर प्रगटन देवून हरकत व आक्षेप मागविण्यात आले. परंतु प्रकरणात हजर होवून कोणीही उजर घेतलेला नाही.

४.       प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने खालील मुद्दे विचाराधीन येतात. सदर मुद्दयांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | काय अर्जदार मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळविण्यास पात्र आहेत काय ? | होय. |
| २) | काय आदेश ? | अर्ज मंजूर. |

## का र ण मि मां सा

**५.** अर्जदाराने स्वतःचे साक्ष सरतपासाचे शपथपत्र निशाणी ९ वर दाखल केले. याशिवाय अर्जदाराने सदर अर्जाच्या पुष्ठयार्थ काशिनाथ लिमजी चौधरी हिच्या मृत्यु प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत निशाणी क्र.१० वर दाखल केली आहे. तसेच, अर्जदाराने वारसांच्या आधाराकार्डाच्या प्रमाणित प्रती अनुक्रमे नि.क्र. ११ ते १४ नुसार अभिलेखावर दाखल केली आहेत. दिनांक ०६/०५/२०२६ रोजी "दैनिक वार्ता" वृत्तपत्रात दिलेल्या जाहिर प्रगटनाची मूळ प्रत निशाणी क्र. १६ वर दाखल केली. तर वारसा अहवाल निशाणी क्र.१५ वर  दाखल केला आहे.

**६.** सरपंच ग्रामपंचायत कुढावद, ता. शहादा, जि.नंदुरबार यांनी दिलेला वारसा दाखल्यावरून मयत काशिनाथ लिमजी चौधरी हिच्या मृत्यू नंतर (मयताचे वारस) १. शकुंतलाबाई लिमजी चौधरी– आई, २. ममता काशिनाथ चौधरी–पत्नी, ३. दिपाली कृष्णा पटेल– मुलगी, ४. चैतन्य काशिनाथ चौधरी–मुलगा  हे वारस असल्याचे दिसते. याशिवाय दिनांक ०६/०५/२०२६ रोजी "दैनिक वार्ता" वर्तमानपत्रात जाहिर प्रगटन देवून प्रकरणात हजर होवून कोणीही हरकत व आक्षेप नोंदविलेला नाही. त्यामुळे  मयत काशिनाथ लिमजी चौधरी हिच्या मृत्यू नंतर (मयताचे वारस) १.शकुंतलाबाई लिमजी चौधरी– आई, २. ममता काशिनाथ चौधरी–पत्नी, ३. दिपाली कृष्णा पटेल– मुलगी, ४. चैतन्य काशिनाथ चौधरी–मुलगा  हे वारस आहेत असे प्रथमदर्शनी दिसते. सदर प्रकरणामध्ये कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यामुळे सदर अर्ज मंजूर करणे योग्य व उचित होईल. त्यामुळे खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

# आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. मयत काशिनाथ लिमजी चौधरी हिच्या मृत्यू नंतर (मयताचे वारस) १. शकुंतलाबाई लिमजी चौधरी– आई, २. ममता काशिनाथ चौधरी–पत्नी, ३. दिपाली कृष्णा पटेल– मुलगी व ४. चैतन्य काशिनाथ चौधरी–मुलगा हे वारस आहेत. त्यामुळे अर्जदारांच्या हक्कात वारसा प्रमाणपत्र देण्यात यावे.

३. अर्जदाराने नियमाप्रमाणे मुद्रांक व कोर्ट फि दयावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by KRUNAL JAGDISH PATEL
Date: 2026.07.09 17:19:49 +0530

**( कृणाल ज. पटेल )**
सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर,
शहादा, जि. नंदुरबार.

शहादा
दिनांक– ०९/०७/२०२६

## दाखला

दाखला देण्यात येतो की, पी.डी.एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ आदेशाप्रमाणेच आहे.

लघुलेखकाचे नावः– कल्पक वसंत पिंगळे

न्यायालयाचे नावः– सह दिवाणी न्यायालय क.स्तर, कोर्ट नं. १, शहादा, जि. नंदुरबार

आदेश जाहिर केलेची तारीखः– ०९/०७/२०२६

आदेशावर न्यायाधीशांची स्वाक्षरी केल्याची तारीखः– ०९/०७/२०२६

आदेश अपलोड केल्याची तारीखः– ०९/०७/२०२६